# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०१/२०२५ (सोमवार) सकाळ**

---

## कन्हान परीसरात सुरू असणाऱ्या वेश्याव्यवसायावर धाड टाकुन देहव्यापार करणाऱ्या पिडीत महिलेची सुटका करून आरोपीस केली अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

पोस्टे कन्हानः— पोलीस स्टेशन कन्हान दि. १९/०१/२०२५ रोजी पोस्टे कन्हान येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिति मिळाली की, आरोपी क्रं. १. मनोहर चीरकूट हूड वय ४७ वर्ष व्यवसाय — (लॉज मालक) रा. टेकाडी ता. पारशिवनी जि. नागपूर २. वेदांत राजेन्द्र लंगडे वय १९ वर्ष व्यवसाय— (उप व्यवस्थापक) रा. वर्हाडा ता. पारशिवनी जि. नागपूर हे स्वतःच्या आर्थिक फायदयाकरिता मुलींना पैश्याचे आमिश देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून रूम उपलब्ध करून देवून देहव्यापार करून घेत आहे तसेच आपले स्वतःचे मालकीचे रेनबो लॉज मध्ये पीडीत मुलीला ग्राहकांस अशी गुप्त माहीती मिळाल्याने रेनबो लॉज, मनसर कन्हान रोड, टेकाडी , कन्हान, ता. पारशिवनी जि. नागपुर येथे पोलीस स्टाफ यांनी जावुन धाड टाकली असता **आरोपी नामे १. मनोहर चीरकूट हूड वय ४७ वर्ष व्यवसाय —लॉज मालक रा. टेकाडी ता. पारशिवनी जि. नागपूर.२. वेदांत राजेन्द्र लंगडे वय १९ वर्ष व्यवसाय— उप व्यवस्थापक रा. वर्हाडा ता. पारशिवनी जि. नागपूर** हे अनैतिक देहव्यापार चालवत असल्याचे खात्री झाल्याने घटनास्थळावरून (१) ३ वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल फोन एकुण ३००००/— किंमतीचे (२) एकुण १६२९०/— नगदी (३) यंत्र उपकरण मध्ये सिसिटिव्ही कॅमेऱ्याचे डि.व्ही.आर. ,१ पॅकेट कोन्डोम,१ रजिस्टार असे मालाची एकुण किंमत ५५३४/—रु. चे जप्त करण्यात आला सदर गुन्हा मध्ये एकुण ५१८२४ रु. किंमतचे माल/नगदी जप्त करण्यात आले.

आरोपीतांविरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३, ५ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ अन्वये गुन्हा नोंद करून ०१ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. यातील दोन्ही आरोपीतास यास अटक केली आहे.

# अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे कन्हानः—** दिनांक १९/०१/२०२५ रोजी पोस्टे कन्हान येथील डी.बी पथक हे पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनिय माहीती मिळाली कि, खदान क्र. ३ येथे राहणारा इसम विधिसघर्षग्रस्त बालक याने सोशल मिडीयावर हातात तलवार घेवुन फोटो काढुन पोस्ट केला आहे. त्यामुळे लोकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाली आहे. यावरून सदर इसमाचे घरी जावुन त्यास विचारपूस केली असता त्याने सांगितले की सदर तलवार ही **आरोपी राजकुमार राधेश्याम हरदेय, रा. कांद्री** याची असल्याचे सांगितले. सदर इसमाचे घराची झडती घेतली असता झडतीत एक लोखंडी पात्याची धारदार तलवार किंमती १२००/— रु. ची मिळून आली. सदर तलवार बाळगण्याचा परवाना बाबत राजकुमार हारदेय तसेच विधीसंघर्ष बालक यास विचारना केली असता त्यानी कोणतेही परवाना नसल्याचे सांगीतल्याने जप्त करण्यात आला.

सदर विधीसंघर्षग्रस्त बालक व पाहीजे इसम नामे राजकुमार राधेश्याम हरदेय वय २० वर्ष रा. कांद्री यांचे विरूद्ध कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये पो.स्टे. कन्हान येथे गुन्हा नोद करण्यात आला, पुढील तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर